सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, कराड

विद्यानगर, कराड ता. कराड जि. सातारा ४१५ १२४.

फोन नंबर (02164) 271 462 ई-मेल - gpkarad.dte@gmail.com

जा.क्रं. शातंक/विवि/एल.सी/२०२६/उ.प-२०२६/ १३१६ दि. १० जून २०२६

**महत्वाची सूचना-**

विषय - शाळा सोडल्याचा दाखला (एल.सी) काढणेसाठी अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रके जोडणे आवश्यक आहे.

१) शाळा सोडल्याचा दाखला (एल. सी) मिळणे बाबतचा विहीत नमून्यातील अर्ज.
२) प्रथम /थेट व्दितीय वर्ष प्रवेश घेतेवेळीस देणेत आलेली कॅपची छायाप्रत.
३) प्रथम सत्र ते सहावे सत्राच्या गुणपत्रिकेच्या छायाप्रती.
४) दहावीच्या गुणपत्रिकेची व शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायाप्रत.
५) प्रथम ,व्दितीय व तृतिय प्रवेश घेतेवेळीस संस्थेत भरलेल्या शुल्काच्या पावत्यांच्या छायाप्रती. (शुल्क भरलेल्या मूळ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे)
६) एस.सी प्रवर्गातील विद्यार्थी--- महाडीबीटी पोर्टलवर ज्या विद्यार्थ्यांना प्रथम, व्दितीय व तृतिय वर्ष शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे, अशा संबंधित विद्यार्थ्यांनी प्रथम, व्दितीय व तृतिय वर्षाचे शुल्क भरणे आवश्यक आहे.
७) आपले सरकार पोर्टलवर एल. सी मिळणेकरीता ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट जोडणे आवश्यक आहे.
८) ज्या विद्यार्थ्यांना शुल्क भरावे लागणार आहे अशा विद्यार्थ्यांनी सदरचे शुल्क रोखपाल यांचेकडे भरणेचे आहे व शुल्क भरलेल्या पावतीची छायाप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
९) वरीलप्रमाणे एल सी मागणी अर्ज व इतर सर्व कागदपत्रके विद्यार्थी विभागातील खिडकी क्रं १ कर्मचारी – श्री.गायकवाड अथवा खिडकी क्रं २ कर्मचारी श्री.कुंभार यांचेकडून तपासून घेवून एल. सी मागणी अर्जामधील विद्यार्थी विभागाची फी बाबतची दिनांकित सही या रकान्यात संबंधित कर्मचारी यांनी संस्थेचे शुल्क बरोबर असल्याची खात्री करुन सही करावी त्यानंतरच एल. सी मिळणे करीता अर्ज व परिपूर्ण कागदपत्रके श्री.कुंभार यांचेकडे जमा करावीत.
१०) वरीलप्रमाणे परिपूर्ण असलेला विहीत नमून्यातील अर्ज व इतर सर्व कागदपत्रके जमा केलेनंतर साधारणः ०७ दिवसानंतर मूळ एल सी मिळेल (सुटीचे दिवस वगळून ). तसेच एल. सी घेतेवेळीस स्वतः विद्यार्थी उपस्थितीत असणे आवश्यक आहे. सोबत संस्थेचे मूळ ओळखपत्र (आयकार्ड ) आणावे . सदर मिळालेला मूळ एल.सी स्वत : तपासून त्यातील सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री करावी व त्यानंतर सदर एल.सी मिळालेची नोंद एल. सी देय नोंद रजिस्टरमध्ये नोंद करावी अन्यथा सदर विद्यार्थ्यास एल. सी मिळणार नाही.

तसेच तयार केलेला मूळ एल.सी संस्थेतून त्वरीत ०७ दिवसानंतर घेवून जाणेचा आहे, अन्यथा मूळ एल सी त्वरीत घेवून न गेल्यास मूळ एल सी बाबतची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहील याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

९/६/२६

(श्रीमती.जयश्री सं पाटील)
प्र.प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कराड.

प्रत- मुख्य सूचना फलकावर सर्व संबंधित विद्यार्थ्यांना माहितीसाठी व पूढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
प्रत- सर्व विभाग प्रमुख यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी .(त्यांनी सदर सूचना संबंधित विद्यार्थ्यांच्या whatsapp ग्रुपवरती पाठवावी.)
**प्रत- संगणक विभाग, शा.तं.कराड यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.**
प्रत- डॅा.एस.व्ही..खवळे, अधि.भौतिकशास्त्र ,तथा संस्था समन्वयक अधिकारी यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी . ( विभाग नियंत्रक विज्ञान विभाग, शा.तं.कराड यांचे मार्फत.)